# जनसंपर्क अधिकारी

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय
रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता.जि.ठाणे
फोन नं. ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनाट क्रमांक-२३८-२२** **दिनांक ०३/०८/२०२२**

## कंपनीतील डाय चोरी करणा-या आरोपीतांना अटक करुन गुन्हयातील १०० टक्के मुद्देमाल हस्तगत-वालीव पोलीस ठाणे, गुन्हे प्रकटीकरण पथकाची कामगिरी.

वालीव पोलीस ठाण्याचे हद्दीमध्ये दिनांक २१/०७/२०२२ रोजी रात्री ०८.३० वा. ते दिनांक २२/०७/२०२२ रोजीचे सकाळी ८.०० वा. च्या दरम्यान फिर्यादी ललित वसंजी छेडा यांची इलाईट एंटरप्राईजेस कंपनीमध्ये अज्ञात चोरटयाने आतमध्ये प्रवेश करुन फिर्यादीच्या कंपनीमधील एकुण २,००,०००/- रुपये किंमतीचे २० डाय हे चोरी केले होते. सदर घटनेबाबत फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन वालीव पोलीस ठाणे येथे I गुरनं ७२३/२०२२ भा.दं.वि.स. कलम-३७९ प्रमाणे दाखल करण्यात आला होता. कालातंराने तपासामध्ये चोरीचा माल हा विकत घेतल्यावरुन वाढीव भादविस कलम ४११, ३४ हे वाढण्यात आले आहे.

सदर गुन्हयाचे तांत्रिक विश्लेषन व गुप्तबातमीमार्फत मिळालेल्या माहितीच्या आधारे सदर गुन्हयाचा तपास करुन गुन्हयातील चोरी करणारे आरोपीत नामे १) मारुफ नियाज अहमद रा. वसई फाटा वसई पूर्व २) मोहम्मद शफिक खान रा. वसई फाटा वसई पूर्व यास सदर गुन्हयात अटक करुन मालाविषयी विचारपुस केली असता आरोपीत ३) मोहम्मद जहीर मो. हामीद खान धानिवबाग नालासोपारा पूर्व यांनी चोरीचा माल घेतल्याबाबत सांगितल्याने तसेच सदर चोरीचा माल घेवुन जाण्याकरिता वाहन चालक आरोपीत नामे ४) इरफान रहमतउल्ला खान, वसई पुर्व ता.वसई या चौघांना अटक करण्यात आली आहे.

सदर गुन्हयात चोरीस गेला २,००,००० रुपये किंमतीचे २० डाय व सदर गुन्हा करण्यासाठी वापरलेली ४०,०००/- रुपये किंमतीची ape कंपनीची तीनचाकी माल वाहतुक रिक्षा क्र एम.एच.०३ ए.एच. ६६४१ अशी एकुण २,४०,००० रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

वरील कामगिरी श्री. संजयकुमार पाटील, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ - २ वसई, श्री. पंकज शिरसाट, सहाय्यक पोलीस आयुक्त, तुळींज विभाग, यांचे मार्गदर्शनाखाली वालीव पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. कैलास बर्वे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री. राहुलकुमार पाटील, गुन्हे प्रकटिकरण शाखेचे सपोनि/ज्ञानेश फडतरे, पोहवा/मुकेश पवार, मनोज मोरे, किरण म्हात्रे, सचिन दोरकर, राजेंद्र फड, पोना /सतिश गांगुर्डे, पो.अंम.गजानन गरीबे, सचिन मोहीते, सचिन खताळ, जयवंत खंडवी यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे.